ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172

**Case No: CGRF/AZ/U/161/2008/82/** **Date:-**
**To,**

**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Bhaurao Mahadu Bagul,
House No.5-2-41, Kotwalpura, Aurangabad.
(Consumer No. 490011455988)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Bhaurao Mahadu Bagul, House No. 5-2-41, Kotwalpura, Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with. related documents.

**The hearing in this matter is kept on 19/12/208 at 15=30 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above**.

Copy to:-
Shri Bhaurao Mahadu Bagul,
**House No. 5-2-41,**
**Kotwalpura,**
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६१/२००८/८२**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०५/१२/२००८**
**निकाल दिनांक ;- १९/०१/२००९**

**श्री भाऊराव महादु बागुल,**
**घर नंबर ५-२-४१,कोतवालपुरा,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११४५५९८८) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित औरंगाबाद.**
**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०५/१२/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १९/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. त्यांना ऑगस्ट २००० ते डिसेंबर २००३ या काळात त्यांच वीज वापर नसतांना देखील सरासरीवर आधारीत बिल आकारण्यात आले. दिनांक २३/०१/२००४ रोजी त्यांचे मीटर बदलण्यात आले. व त्यानंतरच्या काळातील वीज वापराच्या आधारावर त्यांनी वीज बिल दुरूस्ती करून देण्यात आली जी चुकीची असल्याचे त्याचे म्हणणे आहे. अर्जदाराने याबाबत महावितरणच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार केली होती पण त्याची तक्रार फेटळण्यात आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असून वरील काळात त्याच वीज वापर नसल्यामुळे त्यांना सुधारीत बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १९/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री बागुल उपस्थित होते. नोडल अधिकारी श्री राठौर यांना अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. ऑगस्ट २००० ते डिसेंबर २००३ या काळात अर्जदाराचा वीज वापर हा संशयास्पद असल्यामुळे त्यांना मीटर बदलण्यात आल्यानंतरच्या काळातील वीज वापराच्या आधारावर बिल आकारण्यात आल्याचे त्यांनी आपल्या जवाबात म्हटले आहे महावितरण च्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने देखील ग्राहकाची तक्रार फेटाळून लावल्याचे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी मंचात अर्जदाराचे सी.पी.एल.,अंतर्गत समितीचा निर्णयाची प्रत आपल्या जवाबा सोबत दाखल केली.

३)  मंचात दोन्ही बाजुकडुन दाखन करण्यात आलेल्या कागदपत्रावरून व अर्जदाराच्या सी.पी.एल. चे अवलोकन केल्यावर असे आढळून येते की, महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास दिनांक १२/०९/२००० रोजी घरगुती वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला असून त्याला मे २००१ मध्ये वीज बिल देण्यात आले जे सरासरीवर आधारीत आहे. मे २००१ ते २३/०१/२००४ पर्यत म्हणजेच जुने मीटर बदलण्यात आले तापर्यंत महावितरण तर्फे अर्जदारास लॉक स्टेटस दाखवत सरासरीवर आधारीत वीज बिल आकारणी करण्यात आली. मंचात दाखल करण्यात आलेल्या दिनांक २३/०१/२००४ रोजीच्या मीटर बदली अहवालावरून जुन्या मीटर (क्रमांक ८९०४२०८२) ची अंतिम रिडींग ०१२५९ अशी असल्याची नोंद असून मीटर सिलची स्थिती व्यवस्थीत असल्याचे म्हटले आहे महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास मार्च २००३ नंतर नविन मीटर (क्रमांक १६४८६६४) प्रमाणे बिल आकारणी करण्यात आली असुन या बिलाबाबत दोन्ही पक्षात वाद नाही.

४)  अर्जदाराच्या सुनावणीच्या वेळी नोकरी निमीत्त बाहेरगांवी राहिल्यामुळे डिसेंबर २००३ पर्यत त्याचा वीज वापर अत्यंत कमी होता असे अर्जदाराने सुनावणी दरम्यान सांगितले. सी.पी.एल. वरील या काळात सतत लॉक स्टेटस स्थिती दिसुन येत असल्यामुळे अर्जदाराचे हे म्हणणे मंच मान्य करीत आहे. मीटर बदली अहवालावरून जुन्या मीटर वरील अंतिम रिडिंग ही ०१२५९ अशी नमुद केलेली असुन जुने मीटर कार्यरत असल्याचे स्पष्ट होते. यावरून मीटर बसविल्यापासुन ते बदली करण्यात आल्यापर्यत म्हणजेच २३/०१/२००४ पर्यंत अर्जदाराचा एकुण वीज वापर हा १२५९ युनिट असल्याचे स्पष्ट होते. नोडल अधिकारी यांनी जुने मीटरची चाचणी करण्यात आलेली नसल्याचे सांगितले अर्जदाराचे जुने मीटर वीज वापराची योग्य नोंद घेत नव्हते हे नोडल अधिकारी यांचे म्हणणे मंच मान्य करीत नाही.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)    अर्जदारास १३/०१/२००४ पर्यंत जुन्या मीटर वरील सरासरीवर आधारीत देण्यात आलेली सर्व वीज बिल रद्द करण्यात येत आहेत.

२)    नवीन वीज पुरवठा केल्यानंतर ते २३/०१/२००४ या काळात अर्जदारास १२५९ युनिट वीज वापराचे बिल विभागुन देण्यात यावे.

३)    वरील प्रमाणे देण्यात आलेल्या सुधारीत वीज बिलात तसेच पुढील सर्व वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

४)    अर्जदाराने वरील काळात भरलेल्या वीज बिलाची वजावट सुधारीत वीज बिलात करावी व ३० दिवसात अर्जदारास वरीप्रमाणे सुधारीत वीज बिल देण्यात यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१६१/२००८/८२** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री भाऊराव महादु बागुल,**
**घर नंबर ५-२-४१,कोतवालपुरा,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१६१/२००८/८२ )

आपण दिनांक ०५/१२/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**